FORM-1A

N.C.R.B
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

0167729

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र State, जिल्हा मुंबई District, पोलीस ठाणे ला.प्र.वि. Police Station, पहिली खबर क्र. 02 FIR No., वर्ष 2020 Year, दिनांक १५/०७/२०२० Date

2. (i) अधिनियम Act भ्रं.प्रं. अधिनियम १९८८, कलमे Sections कलम ७
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार, तारीख पासून १३/०७/२०२० वेळ १२:२५, तारीख पर्यंत १५/०७/२०२० वेळ १५:४५
   Occurrence of offence : Day, Date from, Time, Date to, Time
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   ✓(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची तारीख ०८/०७/२०२०, वेळ ...........
   Information received at P. S. Date, Time
   (c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. ५२/२०२०, तारीख १५/०७/२०२० वेळ १८:१५
   General Diary Reference : Entry No., Date, Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी — लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा अंदाजे १० कि.मी. उत्तरेकडे, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. वांद्रे (पूर्व)
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S., Chowki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव म्हाडा कार्यालय, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), ठिकाणाचे नंबर कक्ष क्र. ३६५, गल्ली ..........., रस्त्याचे नाव कलानगर
   Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण मातोश्री बंगला, गाव वांद्रे, पोस्ट वांद्रे, तालुका मुंबई, जिल्हा मुंबई, राज्य महाराष्ट्र
   Nearest identifiable place, Village, Post, Taluka, Dist., State
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
   In case, outside the limit of this Police Station, Taluka, Dist, State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name श्री. अशोक सुर्यवंशी
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name रामचंद्र सुर्यवंशी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ४८ वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ९८२१२६२६९१
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...........
   (f) व्यवसाय Occupation केबल व्यवसाय
   (g) धर्म Religion हिंदु, जात Caste मराठा, जनजात Sub-Caste —
   (h) पत्ता Address ५/५०८, गल्ली / सर्व्हे नं. Ward ..........., घर / नाव नं. House/Name No. कृष्णा निवास, फोन / मो. नं. Phone/Mo. No. ९८२१२६२६९१, पॅन नं. PAN No. ..........., कार्ड नं. Card No. ...........
   रस्त्याचे नाव Road डिलाईल रोड, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे समोर, गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn ...........
   तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई - ११, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ...........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

   महेश श्रीकांतराव देशपांडे, वय: ३८ वर्षे, पद: सहाय्यक, नोकरी: इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडा), वांद्रे (पूर्व), मुंबई, रा. ९१ = बी - १०२, ओम गुरुकृपा को.ऑ. हौ. सो.लि. खडकपाडा, संदीप हॉटेलजवळ, कल्याण (पश्चिम), जिल्हा - ठाणे - ४२१ ३०१
   मो. नं. ७७३८०४७२२२

Y.P.P.-800 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned with OKEN Scanner

खालील फिर्यादी श्री. अशोक रामचंद्र सुर्यवंशी, वय - ४८ वर्षे; व्यवसाय - केबल व्यवसाय, रा.ठि. ५/५०८, कृष्णा निवास, डिलाईल रोड, ना.म.जोशी मार्ग, पोलीस ठाणे समोर, मुंबई-११ यांच्या दि. १६/०१/2020 रोजीच्या मराठीत टंकलिखित केलेली फिर्यादी जबाब हिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात आली असुन सोबत जोडण्यात आली आहे.

समक्ष

16/1/2021

(संजय पाटोळे)
सहा. पोलीस आयुक्त,
आ.प्र.वि. मुंबई.

फिर्याद दिनांक १६/०१/२०२०

श्री. अशोक रामचंद्र सुर्यवंशी वय ४८ वर्षे, धंदा – केबल व्यवसाय, रा.ठि.– ५/५०१, कृष्णा निवास, ना.म. जोशी मार्ग, पोलीस स्टेशन समोर, मुंबई ११, मो.नं. ९८२११२६२६११

———०००———

मी वर नमूद प्रमाणे असून नमुद ठिकाणी जन्मापासुन माझी पत्नी सौ. अश्वीनी वय ४२ वर्षे, मुलगी नामे श्रेया वय २२ वर्षे, मुलगी नामे रिया वय १७ वर्षे व मुलगा हर्ष वय १४ वर्षे यांचेसह एकत्रीत कुटूबात वास्तव्यास आहे. माझे मुळ गाव मस्करवाडी, ता. कराड, जि. सातारा येथे असुन माझे शिक्षण दहावी पर्यन्त मुंबई येथे झालेले आहे. मला नोकरी नसल्याने लोअर परेल विभागात गेल्या १५ वर्षापासुन केबल चालक म्हणुन व्यवसाय करित असुन माझेकडे अंदाजे ४५० टिव्ही केबलचे तसेच इंटरनेटची १०० ग्राहक आहेत.

मी रहात असलेल्या इमारतीच्या ४ थ्या माळयावरील रुम न. ४११ व ४१२ हया दोन रुम माहे जुलै २०१९ मध्ये श्री सुरजभान रहेलो राजपुत यांचेकडुन खरेदी करण्याचा व्यवहार केला होता परंतू नमद रुम माझे नावावर नोंदणी केल्या नव्हत्या. माझी भाची नैना सतिष घेवडे हिला रुमची आवश्यकता असल्याने रुम नं. ४१२ ही तिला विकत देवून नोंदणी करणार होतो. माझे शेजारील रूम क्र. ५०८ ही श्री. वसंत श्रीपती पाटील यांचे मालकीची असल्याने मी खरेदी केलेली रूम क्र. ४११ ही रु त्यांना देवून त्यांची रुम नं. ५०८ ही मी खरेदी करणार होतो व त्यास श्री.पाटील हें तयार होते. सदर रूमचा खरेंदी व्यवहार झाला आहे व मी रूम विक्री करतेवेळेस सदर दोन्ही रुमची नोंदणी मी करुन देणार असल्याचे श्री. पाटील व माझी भाची यांना आश्वासन दिले होते.

रुम न. ४११ व रुम न. ४१२ या रुमची खरेदी विक्रीचे दस्तऐवज करुन माझी भाची नामे नैना सतिष घेवडे व श्री वसंत श्रीपती पाटील यांचे नावावर होण्याकरीता दि.१७/१२/२०१९ रोजी म्हाडा, बान्द्रा. मुंबई येथे अर्ज केला होता. म्हाडा कार्यालयात पत्रव्यवहार व पुढील कार्यवाहीकरीता माझी भाची नैना घेवडे व श्री वसंत पाटील यांनी मला लेखी संमती पत्र दिले होते. दि.०६/०१/२०२० रोजी मी म्हाडा कार्यालयास दि. १७/१२/२०१९ रोजी दिलेल्या अर्जाबाबत विचारणा करण्याकरीता म्हाडा कार्यालयातील कक्ष क्र. ३७२ मधील म्हाडा अधिकारी श्री महेश देशपांडे यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी रुम न.४११ व रुम न. ४१२ नावावर करण्यासंबधीत सदरची कागदपत्रे व फाईल्स वरळी म्हाडा कार्यालयास पाठवितो असे सांगुन लवकर काम करण्याकरीता व कामाचा मोबदला म्हणुन माझेकडे एका रुमचे पाच हजार प्रमाणे दोन रुमचे रु. १०,०००/– रक्कम दयावी लागतील असे मला सांगितले. त्यावर मी पुन्हा दि. ०८/०१/२०२० रोजी म्हाडा अधिकारी श्री महेश देशपांडे यांना येवुन भेटलो असता त्यानी माझे काम करुन देण्याकरीता टाळाटाळ केली व माझे रुमचे कागदपत्र व फाईल या वरळी कार्यालयास पाठविल्या नाहीत व दि.०९/०१/२०२० रोजी पैसे घेवुन येण्यास सांगितले. परंतु मला लोकसेवक महेश देशपांडे यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.०९/०१/२०२० रोजी सांयकाळी येवुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे जावून स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार केली. मी केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी श्रीमती नारकर मॅडम यांनी श्री संजय पाटील, सहायक पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. वरळी, मुंबई यांना पुढील कार्यवाहीकरिता आदेश दिले.

मी, दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने मला दि. १०/०१/२०२० रोजी ला.प्र.वि. वरळी, कार्यालयास पडताळणीकरीता बोलविण्यात आले. दि.१०/०१/२०२० रोजी लोकसेवक महेश देशपांडे हे म्हाडा कार्यालयास येणार नसल्याचे त्यांनी मला सांगितले होते म्हणुन त्या दिवशी पडताळणीस जाण्यास मी नकार

समक्ष
16/01/2020
(संजय पाटील)
सहा. पोलीस आयुक्त
ला.प्र.वि. मुंबई

दिला. म्हणुन मला श्री संजय पाटील, सहायक पोलीस आयुक्त यांनी सोमवार दि.१३/०१/२०२० रोजी सकाळी ला.प्र.वि. वरळी, कार्यालयास बोलविले.

मी, दि. ०९/०१/२०२० रोजी दिलेल्या लेखी तक्रारीस अनुसरुन स.पो.आ. संजय पाटील यांना ला.प्र.वि. वरळी, कार्यालयास दि. १३/०१/२०२० रोजी येवुन भेटलो. स.पो.आ. संजय पाटील यांनी मला माझ्या तक्रारीची दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी कारवाई घेण्यात येणार असल्याचे माहिती दिली. तसेच सदर पडताळणीच्यावेळी लोकसेवक व माझेमधील संभाषण ध्वनिमुद्रीत करण्याकरीता माझ्या बनियनला व्हॉईस रेकॉर्डर लावण्यात येणार असल्याचे सांगितले.

त्यानंतर दोन शासकिय पंच व पडताळणी पथक यांचेसह लोकसेवक महेश देशपांडे यांनी माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या पडताळणी संदर्भातील कारवाई सुरु करण्यात आली. माझे सोबत पंच श्री भगवान सांबरे यांचेसह लोकसेवक महेश देशपांडे यांना म्हाडा, बांन्द्रा कार्यालयातील त्यांच्या कक्ष क. ३२७ मध्ये जावुन भेटलो, त्यावेळी लोकसेवक महेश देशपांडे यांनी माझे रुम न.४११ व रुम न.४१२ च्या नावावर करण्यासंदर्भात चर्चा केली त्यावेळी लोकसेवक महेश देशपांडे यांनी माझेकडे पाहून पैसे आणले का? असे हाताच्या इशा—याने विचारणा केली. त्यावर मी किती असा इशा—यानेचे प्रश्न केल्यावर लोकसेवक महेश देशपांडे यांनी 'दे ना काय दयायचे ते' असे म्हणाले. त्यानंतर मी सांगितले की, तुम्ही सांगा असे बोलल्यावर लोकसेवक महेश देशपांडे यांनी त्यांचे टेबलावरील मोबाईल फोन काढुन १८ असे स्क्रीनवर अंक टाईप करुन मला व माझे सोंबत असलेल्या पंचाना दाखविले. त्यानंतर मी ' एकाचे दहा हजार काय? अशी विचारणा केली असता महेश देशपांडे यांनी पहिला हिशोब बाकी असल्याचे मला सांगितले. त्यानंतर मी कामासंदर्भात चर्चा करुन त्यांचे कार्यालयातुन निघुन बाहेर येवुन परत पोलीस वाहनाजवळ जावुन स.पो.आ संजय पाटील, स.पो.आ. देशमुख मॅडम यांना येवुन भेटून लोकसेवक महेश देशपांडे यांनी लाचेची मागणी केली असल्याचे सांगितले. श्री संजय पाटील, स.पो.आ. व देशमुख मॅडम यानी पडताळणी दरम्यान व्हाईस रेकॉर्डरमधील ध्वनिमुद्रीत संभाषण पंचासमक्ष ऐकले त्यावेळी लाचेची मागणीबाबत खात्री झाल्यावर दि. १४/०१/२०१९ रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले.

दि.१४/०१/२०२० रोजी ला.प्र.वि. वरळी कार्यालयास येवुन स.पो.आ संजय पाटील यांना भेटून लाचेसाठी वापरण्यात येणारी रक्कम ही माझ्याकडे केबल व इंटरनेट व्यवसायाच्या उत्पन्नात मधील शिल्लक रक्कमेतील रु. १०,०००/— रक्कम स.पो.आ. संजय पाटील याना सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी दिले. सदरच्या रक्कमेस स.फौ. निंबाळकर यांनी अॅन्थ्रॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर स.पो.आ. संजय पाटील यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच मला लोकसेवक महेश देशपाडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर इशारा म्हणुन सापळा पोलीस पथकास दिसेल अश्या पध्दतीने उजवा हात वारंवार डोक्यावरुन फिरविण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच भगवान सांबरे असे लोकसेवक श्री. महेश देशपाडे यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक महेश देशपाडे यांच्या कार्यालयाच्या आवारात सापळा पथक हजर होते. लोकसेवक महेश देशपाडे यांच्या कार्यालयात आल्यावर मी त्यांच्या कक्षात गेलो असता आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक महेश देशपाडे यांनी नंतर येण्यास सांगितले व ते त्यांच्या कामासाठी कॅबिनच्या बाहेर निघुन गेले. म्हणुन मी, पंच व सापळा पथक पोलीस वाहना जवळ येवुन स.पो.आ संजय पाटील यांच्याशी चर्चा केली. त्यावर त्यांनी ला.प्र.वि. वरळी कार्यालयास परत आलो. लोकसेवक यांनी मागणी केलेली देण्यासाठी घेवून आलेलो लाचेची रक्कम मी घरी जातेवेळी घेवून गेलो.

त्यानंतर पुन्हा दि. १५/०१/२०२० रोजी ला.प्र.वि. वरळी कार्यालयास येवुन स.पो.आ. संजय पाटील याना भेटलो असता, दि.१४/०१/२०२० रोजीच्या सापळा पुर्व/सापळा कारवाईवेळी लोकसेवक

(संजय पाटील)
सह. पोलीस आयुक्त
ला.प्र.वि. मुंबई

महेश देशपाडे यांनी नंतर येण्यास सांगितल्यावरुन मी लोकसेवक महेश देशपाडे यांचे मोबाईलवर कॉल केला. त्यावेळी त्यांनी दुपारी तीनच्या आत येण्यास सांगितले. परंतु मी मकर संक्रात सण असल्याने येवु शकत नसल्याचे सांगुन गुरुवार दि. १६/०१/२०२० रोजी येतो असे सांगितले

दि.१६/०१/२०२० रोजी ला.प्र.वि. वरळी कार्यालयास येवुन स.पो.आ संजय पाटील यांना भेटून लाचेसाठी वापरण्यात येणारी रक्कम ही माझ्याकडे केबल टी.व्ही व इंटरनेट व्यवसायाचे बचती मधील शिल्लक रु. १०,०००/– रक्कम स.पो.आ. संजय पाटील याना सापळा कारवाईकरीता वापरण्यासाठी दिले. सदरच्या रक्कमेस स.फौ. निंबाळकर यांनी ॲन्थॉसीनची पावडर लावली व ती रक्कम माझ्या पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवली. त्यानंतर स.पो.आ. संजय पाटील यांनी मला, पंच व सापळा पथक यांना सापळा कारवाई दरम्यान खबरदारीच्या सुचना दिल्या. तसेच मला लोकसेवक महेश देशपाडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर इशारा म्हणुन सापळा पोलीस पथकास दिसेल अश्या पध्दतीने उजव्या कानामध्ये बोट घालुन हलवणेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच जयेश वरगडे असे लोकसेवक श्री. महेश देशपाडे यांना भेटण्याकरीता त्यांच्या कार्यालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक महेश देशपाडे यांच्या कार्यालयाच्या आवारात सापळा पथक हजर होते. लोकसेवक महेश देशपाडे यांच्या कार्यालयात आल्यावर मी त्यांच्या कक्षात गेलो असता आमच्यामध्ये कामासंदर्भात चर्चा झाली. त्यावेळी लोकसेवक महेश देशपाडे यांनी माझी फाईल जावक करण्याकरीता त्यांचे समोरील असलेल्या टेबलावर जावक नोद करण्याकरीता दिली. तेथील कर्मचारी यांनी सदरची फाईल जावक नोंद केली व सदर जावक केलेल्या फाईलमधील प्रतीची माझे मोबाईल फोटो काढुन घेतला व माझा मोबाईल परत मला दिला व सदरची फाईल जावक कर्मचारी यांचेकडे परत दिली ती फाईल त्यांने त्यांच्या कपाटामध्ये ठेवली. त्यांनतर लोकसेवक महेश देशपांडे यांनी मानेने व डोळयाने बाहेर जाण्याबाबत इशारा करून माझे खादयावर हात टाकुन साहेबाकडे जावुया असे सांगितले व कार्यालयाच्या बाहेर येवुन रुम न.३६६ मध्ये नेले तेथे कोणीही नव्हते. लोकसेवक महेश देशपाडे हे तेथील सोफावर बसुन **'देवुन टाक'** असे म्हणाले. त्यावर मी म्हणालो किती? त्यावेळी त्यांनी माझे कडे 'वीस' असे सांगितले. त्यावर मी त्यांना विचारले वीस हजार का? त्यावेळी त्यांनी दोन वेगवेगळया फाईलच आहे असे सागितले. त्यावेळी तडजोडीमध्ये 'पाच कमी दे' असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना दहा आणले असे सांगितले. त्यावर लोकसेवक देशपाडे यांनी पाच कमी दे असे सांगितले. त्यावेळी मी दहाच आणलेत तेवढेच घ्या असे सांगितले असता ते मला ओके असे म्हणाले. त्यावर मी माझे पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम रु.१०,०००/– लोकसेवक महेश देशपाडे यांच्या समोर केली असता ती लाचेची रक्कम लोकसेवक महेश देशपाडे यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन ती त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवली. त्यानंतर मी व लोकसेवक महेश देशपांडे रुम न.३६६ च्या बाहेर आलो. मी बाहेरी येवुन लोकसेवकाने लाच स्विकारल्याबाबत उजव्या कानामध्ये बोट घालुन हलविले असा पुर्व नियोजीत इशारा केल्यावर कक्षाच्या आजू बाजूस उभे असलेले सापळा पथकातील पो.नि.सुप्रीया नटे व पोशि श्रीमती कदम यानी लोकसेवक महेश देशपाडे यांना लाचेच्या रक्कमेसह पकडून रूम न. ३६६सदर रुममध्ये प्रवेश करुन रंगेहात पकडले. त्यानंतर काही वेळातचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी नमुद कक्षात येवून लोकसेवकास लाचेचे रक्कमेसह जागीच अटकावून ठेवले. सपोआ देशमुख यांनी पथकातील अंमलदार सोनोने यांचे मार्फतीने मला लावलेला व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करून सपोआ पाटील यांचे ताब्यात दिला.

वरील नमुद दि. १३/०१/२०२० रोजीच्या पडताळणी व दिनांक १४/०१/२०२० तसेच दि. १६/०१/२०२० रोजीच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक महेश देशपाडे यांचेशी माझे झालेले संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्यात आले. सदर ध्वनिमुद्रीत संभाषण स.पो.आ. संजय पाटील यांनी मला ऐकवून माझे मदतीने पोलीस अंमलदार सोनोने यांच्या मार्फतीने त्याची प्रतिलिपी संगणकावर तयार केली. मी व लोकसेवक महेश देशपाडे यांचे मध्ये झालेले संभाषण ओळखुन त्याबाबत पोलीस अंमदार सोनोने यांना दिलेल्या माहितीवरुन श्री सोनवणे यांनी संभाषणासमक्ष तशी नोंद घेतली आहे.

समक्ष
(संजय पाटील)
सहा. पोलीस आयुक्त
ला. प्र. वि. मुंबई



Scanned with OKEN Scanner

लोकसेवक महेश देशपाडे यांच्याशी माझे कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देवाण–घेवाणीचे व्यवहार नाहीत. तरी लोकसेवक महेश देशपाडे यांनी कायदेशीर परिश्रमाखेरीज माझे भाची नामे नैना घेवडे व श्री वसंत पाटील यांचे नावे रुम करुन देण्याकरीता त्याचा मोबदला / बक्षीस म्हणुन माझेकडे रु. २०,०००/– इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रू.१०,०००/– इतकी रक्कम स्विकारली म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द् कायदेशिर फिर्याद आहे.

माझा जबाब मराठीत संगणकीकृत केला असून तो मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगितल्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

16/01/2020

(संजय पाटील)
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

(अशोक रामचंद्र सुर्यवंशी)
16-1-2020



Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... —
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... —
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... —
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी त्यांचे शेजारी व त्यांची भाची यांना विक्री केलेल्या सदनिका फिर्यादी यांच्या नावावरुन खरेदीदार यांच्या नावे करण्याकरिता फिर्यादीने दिलेल्या अर्जावरील कार्यवाही आलोसे यांच्या कार्यालयात प्रलंबित होती. ती पुर्ण करण्याकरिता आलोसे यांनी फिर्यादीकडे रु. १०,०००/- इतक्या रकमेच्या लाचेची मागणी करुन लाच स्विकारुन लाचेचा स्वतःसाठी गैरलाभ स्विकारला म्हणुन भ्र.प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
श्री. संजय पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त, लाँ.प्र.वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)...... Rank...... No...... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to...... (3) Transferred to P. S. ...... District...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)
[signature] 16-1-2020

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

[signature] 16/01/2020
पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ...... संजय पाटील
पदनाम Rank ...... सहाय्यक पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड क्र. ...... लाँ.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...... १७/०९/२०२०
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, ✓2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner